प्रेसनोट

दिनांक ०९/०३/२०२०

**आरोपी धोंडीराम निवृत्ती सोनहिवरे वय ५७ वर्षे पद सहायक पोलीस उपनिरीक्षक वर्ग–३ नेमणुक पोलीस स्टेशन किनगाव ता. अहमदपुर यांनी तक्रारदार यांना ४,०००/–रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम घेण्याचे जाणुन बुजून टाळले आहे म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांच्या व त्यांच्या भाच्याच्या विरोधात पोलीस स्टेशन किनगांव येथे दिलेल्या तक्रारी अर्जात कार्यवाही न करण्या करीता बीट जमादार सोनहिवरे यांनी ५,०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार दिनांक ०३/०३/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालय येथे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक ०३/०३/२०२० रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी सोनहिवरे, सपोउपनि यांनी तक्रारदार यांच्या व त्यांच्या भाच्याच्या विरोधात पोलीस स्टेशन किनगांव येथे दिलेल्या तक्रारी अर्जात कार्यवाही न करण्या करीता पंचासमक्ष लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३,०००/–रुपयाच्या वर काही तरी दे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. परंतु ३०००/–रुपयाच्या वर काही तरी दे म्हणाल्याने ४,०००/–रुपये देण्याचे ठरवुन लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक ०३/०३/२०२० ते ०९/०३/२०२० रोजी पर्यंत आरोपी लोकसेवक सोनहिवरे, सपोउपनि यांच्याकडे पाठविले परंतु त्यांनी लाचेची रक्कम घेण्याचे जाणुन बुजून टाळले आहे.

आलोसे यांच्या विरुध्द तक्रारदार यांच्या फिर्यादीवरुन पोस्टे. किनगांव गुरनं २५/२०२० कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये दिनांक ०९/०३/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

पुढील तपास पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, सचिन धारेकर, शैलेश सुडे, दत्ता विभुते, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड | :– मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर